

# 2000 क्विंटल कापसाचे उत्पादन घेणारा शेतकरी

**शिराळयाच्या विजयराव देशमुखांचा यशस्वी प्रयोग,**

शेती व्यवस्थापनाचे उत्तम नियोजन, व्यवहारीक काटेकोरपणा, मजुरांसोबत कामाच्याबाबत आवश्यक समन्वय व यांत्रीकिकरणाचा केलेला उपयोग, यांचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे अमरावती जिल्ह्यातील शिराळा येथील विजय उर्फ मनोहर देशमुख यांनी केलेली शेती. स्वतःच्या 50 एकर शेतीच्या जोडीला इतरांच्या करार शेतीच्या माध्यमातुन 210 एकर अशी 260 एकरावर शेती करणारे ते यशस्वी शेतकरीत आहेत. जिथे 5 एकर शेतीचे नियोजन करतांना शेतक-यांची तारांबळ उडते अशा ठिकाणी 260 एकर शेतीचे संपुर्ण व्यवस्थापन सांभाळणारे विजयराव तेवढेच शांत दिसतात. वर्षाकाठी 50 लाखाचा निव्वळ नफा घेणारा शेतकरी कापुस, सोयाबीन, तुर, उडीद पिकाचा मॅनेजमेंट गुरुच म्हटला पाहीजे.

अमरावती जिल्ह्यातील शिराळा हे गाव परंपरागत शेतीसाठी प्रसिध्द आहे. सुपिक जमीन मुबलक पाणी आणि कष्टाळु शेतकरी अशी जरी या भागाची ख्याती असली तरी, बदलत्या काळात कराव्या लागणा-या बदलाच्या बाबतीत आजही येथील शेती पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेने मागेच म्हणावा लागेल. व्यावसाय व नोकरी पैशासाठी गावसोडुन शहरात वास्तव्य असलेले अनेक शेतकरी या परीसरात हमखास बघावयास मिळतात. गावापासुन लांब असल्यामुळे त्यांची शेती पडीक राहते. नेमकी हिच बाब हेरुन विजयरावांनी याचा उपयोग करण्याचे ठरविले. शहरात राहणा-या अशा शेतक-यांची शेती वार्षीक करार पध्दतीने करण्याचे त्यांनी ठरविले. गेल्या 4 वर्षापासुन त्यांचा हा प्रयोग यशस्वीरित्या सुरु आहे. शेतीमध्ये कापुस, तुर, सोयाबीन व उडीद या पध्दतीने ते नियोजन करतात. स्वतःच्या 50 एकर क्षेत्र त्यांनी ड्रिप करुन सिंचनाखाली आणली आहे. उरलेल्या 55 एकर क्षेत्रामध्ये तुषार सिंचनाने ते पिकाला पाणी देतात. कंपनीच्या आकर्षक जाहिरातीला बळी न पडता, अनुभवाच्या आधारे व पिकांवर येणा-या रोग व किडींचा शास्त्रीय अभ्यास करुन, खतांचा व किटकनाशकांचा वापर ते करतात. अनावश्यक औषधांच्या वापरावर त्यांच्याकडे थारा नाही.

आज 105 एकर कापुस, 120 एकर तुर, सोयाबीन, 40 एकर उडीद, तुर या पिकाचे लागवडी पासुन ते काढणी पर्यंत बहुतांश व्यवस्थापन विविध यंत्रांच्या सहाय्याने ते करत आहेत. हार्वेस्टर सारखे महागडे यंत्र त्यांनी खरेदी केले. अजीत 155 ची निवड आपल्या 105 एकरावर त्यांनी 155 या कपाशीच्या वाणाची लागवड केली. हे इकडच्या जमीनीला पोषक व रोगाला प्रतिकारक व सुध्दृढ असल्याचे विजयराव देशमुख यांची म्हणणे आहे.

विजय उर्फ मनोहर देशमुख,
शिराळा, जिल्हा अमरावती
9860310652